# संत रामदास
## आणि
# संत तुकाराम

**डॉ. जगदीश करमळकर**

**प्रकाशक-मुद्रक**
श्री समर्थ रामदास जन्मोत्सव चतु:शताब्दी सोहळा
वैष्णव ब, २१८४ सदाशिव पेठ, पर्वती रस्ता, पुणे ३०. दूरध्वनी : २४३३१३९८
**प्रथमावृत्ती :** २००७
© डॉ. जगदीश करमळकर,
अद्वैत, तपोधन सोसायटी, सहकारनगर, पुणे ९. फोन : (०२०) २४२२२१६४
**टाइपसेटिंग :** एच. एम. टाइपसेटर्स, ११२०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
**मुद्रणस्थळ :** स्मिता प्रिंटर्स, १०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
**मूल्य १० रु.**

*कै. नारायण रामचंद्र ऊर्फ बापूसाहेब स्वामी*
*यांच्या स्मरणार्थ*
*श्रीमती उषा स्वामी यांचेकडून समर्थ सेवा.*

## नरदेह स्तवन

महाराष्ट्र संतांची भूमी, महंतांची भूमी. या महाराष्ट्रात संतांची मांदियाळीच होती अन् आहे. ही परंपरा सुरू होते ती कैवल्यसम्राट ज्ञानेश्वर महाराजांपासून. यात अठरा पगड जातीचे संत होते. ब्राह्मण, मराठा, नाभिक, सुतार, सोनार, महार, चांभार, कसाई, वाणी. या संतांनी महाराष्ट्रात भक्तीचे मळे फुलवले. भक्तीच्या माध्यमातून नराचा नारायण केला. या भूमीत भक्ती अन् शक्ती युक्तीने एकत्रित नांदली. याच भूमीत संतांचे राजे ज्ञानेश्वर महाराज, तर राजांमधील संत छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले. देवांनाही हेवा वाटावा अशी ही भूमी.

इ.स. १६०८ मध्ये या महाराष्ट्रात नवल घडले. कालपुरुषही कालगणना करीत असताना क्षणभर थांबला असेल. या वर्षी दोन अवतारी पुरुषांचे अवतरण झाले. हे दोन महापुरुष म्हणजे राष्ट्रगुरू **समर्थ रामदास** व **जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज.** समर्थांचा जन्म जांबेचा, साधनेचे स्थान टाकळी नासिक, तर कार्यक्षेत्र कृष्णाखोरे. तुकाराम महाराजांचे जन्मस्थान साधनास्थळ व कार्यक्षेत्र देहू. दोघांचे उपास्यदैवत भिन्न. समर्थांचे उपास्यदैवत प्रभू रामचंद्र, तर तुकोबारायांचे पांडुरंग. दोघांचे संप्रदाय पण भिन्न. समर्थांचा रामदासी संप्रदाय तर तुकोबांचा वारकरी संप्रदाय. वरपांगी ही भिन्नता असली, तरी अंतरंगातून ते एकच होते. दोघांनी जळी-स्थळी-काष्ठी पाषाणी नटलेल्या चैतन्याची अनुभूती घेतल्याने दोघांनी एकच विचार मांडले. समर्थ रामदास म्हणतात, **''साधू दिसती वेगळाले । परि ते स्वरूपी मिळाले''** दोघांच्या विचारांतील ऐक्य मांडण्याचा हा अल्पसा यत्न.

या पृथ्वीवर अनेक सजीव आहेत. परमेश्वराने माणसाला आगळावेगळा देह देऊन विचार करण्याचे व ते विचार प्रकट करण्याचे सामर्थ्य प्रदान केले आहे. या नरदेहाच्या आधारेच तो देव किंवा दानव होऊ शकतो. त्यालाच ठरवायचे आहे की, आपण GOD व्हावयाचे की DOG व्हावयाचे. देवत्वाच्या दिशेने प्रवास करण्याचे साधन म्हणजे हा नरदेह म्हणूनच हे संतद्वय नरदेहाचे स्तवन करतात.

**श्री समर्थ रामदास**

*धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहो ।*
*जो जे की जे परमार्थ हो । तो तो पावे सिद्धीते ।।१।१०।१*

*देह परमार्थी लाविले । तरीच याचे सार्थक जाले ।*
*नाही तरी हे वेर्थचि गेले । नाना आघातें मृत्युपंथे ।१।१०।६१*

*बहुता जन्माचा सेवट । नरदेह सापडे अवचट ।*
*येथे वर्तावें चोखट । नीति न्यायें ।।११।३।१*

*या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनाचेनि द्वारें ।*
*मुख्य सारासार विचारें । बहुत सुटलें ॥१।१०।१८*

*या नरदेहाचेनि संमंधे । बहुत पावले उत्तम पदे ।*
*अहंता सांडूनि स्वानंदे । सुखी जाले ॥१।१०।१९*

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*मोलाचें आयुष्य वेचोनियां जाय । पूर्वपुण्ये होय लाभ याचा ॥१॥*
*अनंत जन्मीचा शेवट पाहतां । नरदेह हातां आला तुझ्या ॥२॥*
*करील तें जोडी येईल कार्यासी । ध्यावें विठ्ठलासी सुखालागी ॥३॥*
*सांचलिया धन होईल ठेवणें । तैसीं नारायण जोडी करा ॥४॥*
*करा हरीभक्ती परलोकीं कामा । सोडवील यमा पासोनियां ॥५॥*
*तुका म्हणे करा आयुष्याचें मोल । नका वेचूं बोल नामाविण ॥६॥*

सार्थ तुकारामाची गाथा अभंग क्र. ३०२४

*शरीर उत्तम चांगले । शरीर सुखाचे घोसुलें ॥*
*शरीरें साध्य होय केलें । शरीरें साधलें परब्रह्म ॥*
*शरीर सकळही शुद्ध । शरीर निधीचाही निध ॥*
*शरीरें तुटे भवबंध । वसे मध्यभागीं देव शरीर ॥*
*शरीरा दुःख नेदावा भोग । न द्यावे सुख न करीं त्याग ॥*
*शरीर वोखटें ना चांग । तुका म्हणे वेग करीं हरिभजनी ॥*

सार्थ तुकाराम गाथा ४११३

## शरीर दुःखाचे कोठार

परमेश्वर प्राप्तीचे साधन म्हणजे हा नरदेह. या शरीराच्या साहाय्यानेच धर्माप्रमाणे वागून; जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळवायची. **''शरीरमाद्यं खलु धर्म साधनम् ।''** पण हे शरीर आहे तरी कसे?

**श्री समर्थ रामदास**

*पाहतां शरीराचे मूळ । या ऐसे नाही अमंगळ ।*
*रजस्वलेचा जो विटाळ । त्यामध्ये जन्म यांसी ॥३।१।११*
*नर्काचे कोठार भरले । आंत बाहेरी लिडबिडले ।*
*मूत्र पोतडें जमले । दुर्गंधीचे ॥३।१।१८॥*



**जगद्गुरू श्री तुकाराम**

*शरीर दुःखाचे कोठार । शरीर रोगाचें भांडार ॥*
*शरीर दुर्गंधीची थार । नाही अपवित्र शरीरा ऐसे ॥*
*शरीर विटाळाचे आळे । माया मोहपाश जाळे ॥*
*पतन शरीराच्या मुळे । शरीर काळें व्यापिलें ॥* सार्थ तुकाराम गाथा ४११३

## गृहस्थाश्रम

माणूस जन्माला येतो हळूहळू तो वाढू लागतो. शाळेत जातो. शिक्षण घेतो. नोकरी किंवा व्यवसाय करतो. त्याचा विवाह होतो. एकीकडे आपल्या मुलांकडे लक्ष देतो. तसेच आपल्या वृद्ध आई-वडिलांची काळजी घेतो. आल्यागेल्यांचे योग्य ते स्वागत करतो. या प्रपंचात किंवा गृहस्थाश्रमात आपले वर्तन कसे असले पाहिजे? प्रपंच आणि परमार्थ याची सांगड कशी घातली पाहिजे? पैसे तर मिळवलेच पाहिजेत, पण त्याचा विनियोग कशाप्रकारे करावा याचे मार्गदर्शन खालील चरणांतून आपणांस मिळेल.

**श्री समर्थ रामदास**

*नाना वेष नाना आश्रम । सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम ।*
*जेथे पावती विश्राम । त्रैलोक्यवासी ॥१४।१।१*

*आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।*
*येथे आळस करूं नका । विवेकी हो ॥१२।१।१*

*प्रपंची पाहिजे सुवर्ण । परमार्थी पाहिजे पंचीकरण ।*

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*जोडोनियां धन उत्तम व्यवहारें । उदास विचारें वेच करी ॥१॥*
*उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥२॥*
*परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माया ॥३॥*
*भूतदया गाई पशूंचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ॥४॥*
*शांतिरुपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलांचे ॥५॥*
*तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ । परम पद बळ वैराग्याचे ॥६॥*

सार्थ तुकाराम गाथा २०८५

## दिनचर्या

सध्याच्या धावपळीच्या काळात वेळेचे नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. ज्याला

जीवनात यशस्वी व्हावयाचे असेल, त्याला वेळेचे नियोजन करावेच लागते. गमावलेला पैसा परत मिळवता येतो. पण गेलेला काळ परत कधीच मिळवता येत नाही. यासाठी आखीव, रेखीव दिनचर्या हवी. प्रपंचाबरोबर ज्याला परमार्थात वाटचाल करायची असेल त्याची दिनचर्या कशी असावी त्याचे हे मार्गदर्शन.

**श्री समर्थ रामदास**

*क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें ।*
*न लिंपे कदा दंभवादे विवादे ॥*
*करी सुख संवाद जो उगमाचा ।*
*जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥* मनाचे श्लोक ५२

*मुखमार्जन प्रात:स्नान । संध्या तर्पण देवतार्चन ।*
*पुढे वैश्य देव उपासन । येथासांग ॥११।३।१७*

*कांही धर्मचर्चा पुराण । हरिकथा निरुपण ।*
*वाया जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥११।३।२६*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*काळ सारावा चिंतनें । एकान्तवासी गंगास्नानें ॥*
*देवाचें पूजनें । प्रदक्षिणा तुळसीच्या ॥१॥*

*युक्त आहार विहार । नेम इंद्रियांसी सार ।*
*नसावी बासर । निद्रा बहुभाषण ॥२॥*

*परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ।*
*व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥३॥*

*देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ।*
*होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥४॥* सार्थ तुकाराम गाथा ५८५

## अन्नसेवनविधी

रात्रीच्या जेवणाच्यावेळी कुणाच्या घरी आपण गेलो की एक चित्र हमखास आपल्याला बघायला मिळते. हॉलमध्ये दूरदर्शनसमोर घरातील सर्वजण दूरदर्शनवरील मालिका एकाग्रतेने पाहात जेवण करीत असतात. भोजनाकडे लक्ष नसल्याने, पचनक्रियेवर याचा निश्चितच दुष्परिणाम होतो. तसेच विवाहसमारंभ किंवा अन्य कार्यक्रमांत उभ्याने स्वरुची भोजन (Buffet Dinner) असते. याचाही पचनक्रियेवर



परिणाम होतो. याऐवजी पाटावर बसून थोडे उच्चासनावर ताट ठेवून गप्पागोष्टी मारत, ज्याच्या कृपेमुळे हे सुग्रास भोजन मिळाले त्याचे स्मरण करीत जेवल्याने अन्न चांगल्याप्रकारे पचणार नाही काय?

**श्री समर्थ रामदास**

*जनीं भोजनीं नाम वाचे वदावे ।*
*अती आदरे गद्य घोषे म्हणावे ॥*
*हरीचिंतनी अन्न सेवीत जावे ।*
*तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥* मनाचे श्लोक ८९

*वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे ।*
*सहज हवन होते नाम घेतां फुकाचे ॥*
*जीवन करि जिवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।*
*उदरभरण नोहें जाणिजे यज्ञ कर्म ॥*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*पवित्र ते अन्न । हरिचिंतनी भोजन ॥१॥*
*येर वेठ्या पोटभरी । चाम मसकाचे परी ॥२॥*
*जेऊनियां तोचि धाला । हरिचिंतनी काला केला ॥३॥*
*तुका म्हणे चवीं आले । जे कां मिश्रित विठ्ठलें ॥४॥*

*सार्थ तुकाराम गाथा २०४३*

## नम्रता

श्रीमंत, विद्यावंत, कलावंत लोक भरपूर आहेत, पण जे लोक हे सर्व असूनदेखील नम्र आहेत. त्यांनाच समाज मान देतो. भारताचे माजी राष्ट्रपती मा. अब्दुल कलाम थोर शास्त्रज्ञ आहेत. त्यांच्या विनयशील वृत्तीमुळे ते आपल्या आदरास प्राप्त आहेत. संतांच्या साहित्यातून त्यांचा विनय स्पष्टपणे आपणांस जाणवतो. संतांची नम्रता भगवद्‌भक्तीतून निर्माण झाल्यामुळे ती सहज, स्वाभाविक वाटते.

**श्री समर्थ रामदास**

*सकळांसि नम्र बोले । मर्यादा धरून चाले ।*
*सर्वजन तोषविले । तो सत्त्वगुण ॥२।७।६३*

*मनां श्रेष्ठ धारिष्ट्य जीवी धरावे ।*
*मनां बोलणे नीच सोशीत जावे ॥*

*स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।*
*मनां सर्व लोकांसि रे नीववावे ॥* म. श्लोक ७

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता ॥१॥*
*हेचि शूरत्वाचे अंग । हारी आणिला श्रीरंग ॥२॥*
*अवघा झाला पण । लवण सकळां कारण ॥३॥*
*तुका म्हणे पाणी । पातळपणें तळां आणी ॥४॥* सार्थ तुकाराम गाथा ९२८

## अधम किंवा दुर्जनांशी वागण्याची रीत

नम्रवृत्ती अंगी अवश्य बाणवली पाहिजे, पण नम्रता म्हणजे कमजोरपणा नव्हे. 'We are polite but politness should not be our weak point.' समाजात वावरत असताना 'जशास तसे' वागावे लागते. लोकांची कल्पना अशी असते की, आध्यात्मिक माणूस शांत, सहनशील असतो. त्याच्याशी कसेही वागले तरी तो सर्व काही शांतपणे सहन करणार. समाजात वीरवृत्ती निर्माण व्हावी. म्हणून हे दोन्ही संत अधमाशी कसे वागावे ते सांगतात.

**श्री समर्थ रामदास**

*धटांसि आणावा धट । उद्धटांसि पाहिजे उद्धट ।*
*खटनटांसि खटनट । अगत्य करी ॥*
*हुंब्यास हुंब्या लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।*
*लौंदापुढे उभा करावा । दुसरा लौंद ॥*
*जैशास तैसा जेव्हा भेटे । तेव्हा मज्यालसी थाटे ।*
*इतुके होते परि धनी कोठे । दृष्टिस न पडे ॥*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेंदू ऐसे ॥१॥*
*मेले जित असे निजोनिया जागे । जो जो जें जें मागे ते ते देऊं ॥२॥*
*भले तरीं देऊ गांडीची लंगोटी । नाठाळ्याचे काठी देऊ माथां ॥३॥*
*मायाबापाहुनि बहु मायावंत । करूं घातपात शत्रूहुनि ॥४॥*
*अमृत ते गोड काय आम्हां पुढे । विष तें बापुडें कडु किती ॥५॥*
*तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परी ॥६॥*

सा. तु. गा. ५८६



## परोपकार

शहरांमध्ये फ्लॅटस्‌मुळे बंद दाराची संस्कृती निर्माण झाली आहे. प्रत्येकजण मी व माझे एवढाच विचार करीत आहे. या कूपमंडुक वृत्तीमुळे आपले नुकसान होते आहे. यामुळे भरदिवसा घरफोडी, दरोडे पडत आहेत. खेडेगावात उपेक्षित वस्त्यांमध्ये अजून तरी एकमेकांना मदत करण्याची भावना टिकून आहे. अडीअडचणीत असलेल्याला मदत करणे. त्यांच्या संकटाचे वेळी निरपेक्षवृत्तीने मदत करणे म्हणजे परोपकार. तुकोबारायांच्या भाषेत सांगायचे म्हणजे. **'पुण्य परउपकार पाप ते परपीडा.'**

**श्री समर्थ रामदास**

*शरीर परोरकारीं लावावे । बहुतांच्या कार्यास यावे ।*
*उणें पडों नेंदावें । कोणी येकांसि ॥१२।९।५*
*आंडले जांकसले जाणावें । यथानशक्ती कामांस यावे ।*
*मृदुवचनें बोलत जावें । कोणी येकांसि ॥१२।९।६*
*दुसऱ्याच्या दुःखे दुखवावे । परसंतोषें सुखी व्हावे ।*
*प्राणीमात्रांस मेळवून घ्यावे । बऱ्या शब्दे ॥१२।९।७*
*परोपकार सांडू नये । परपीडा करूं नये ।*
*विकल्प पडों देऊ नये । कोणी येकांसि ॥१४।१।४४*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*जे कां रंजलें गांजलें । त्यांसि म्हणे जो आपुले ॥१॥*
*तोचि साधु वोळखावा । देव तेथेचि जाणावा ॥२॥*
*मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनांचे चित्त ॥३॥*
*ज्यासि आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयीं ॥४॥*
*दया करणे जे पुत्रांसि । तेचि दासां आणि दासी ॥५॥*
*तुका म्हणे सांगू किती । त्याचि भगवंताच्या मूर्ती ॥६॥*

सार्थ तुकाराम गाथा अभंग क्र. २०१

## प्रयत्न

जीवनातील कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल, तर प्रथम ध्येय निश्चित करावे लागेल. त्या ध्येयानुकूल सकारात्मक विचार करावे लागतील व ध्येयप्राप्तीसाठी अथक प्रयत्न करावे लागतील. तरच यश प्राप्त होईल. आपले सर्वच संत प्रयत्नवादी आहेत. एकही संत दैववादी नाही. त्यामुळे सर्वच संतांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार

केला आहे. श्री समर्थ रामदास व तुकोबारायांचे काळात धर्माला ग्लानी आलेली होती. समाजात निष्क्रियता बोकाळली होती. अशावेळी समाजात चैतन्य निर्माण करण्यासाठी या दोन्ही संतांनी प्रयत्नवादाचा प्रखर पुरस्कार केलेला आहे.

**श्री समर्थ रामदास**

*कष्टेविण फळ नाही । कष्टेविण राज्य नाही ।*
*केल्याविण होत नाही । काहीं जनीं ।।१८।७।३*

*प्रेत्नेविण राहू नये । आळस दृष्टी आणूं नये ।*
*देह अस्तां पाहू नये । वियोग उपासनेचा ।।१४।१।६०*

*आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा ।*
*शब्द मत्सर न करावा । कोणी येकाचा ।।१२।१०।१३*

*आळसे कार्यभाग नासतो । साक्षेप होत होत होतो ।*
*दिसते गोष्टीं कळेना तो । शाहणा कैसा ।।१४।५।२७*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*ओले मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ।।१।।*
*नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाहीं कईवाड तोचि वरि ।।२।।*
*दोरें चिरां कापे पडिला कांचणी । अभ्यासे सेवनी विष पडे ।।३।।*
*तुका म्हणे कैचा बैसण्यास ठाव । जठरी बाळां वाव एकांएकी ।।४।।*

सार्थ तुकाराम गाथा अभंग क्र. ८४८

*साधुनी बचानाग खाती तोळा तोळा । आणिकांते डोळा न पहावे ।।१।।*
*साधुनी भुजंग धरतील हातीं । आणिक कांपती देखोनियां ।।२।।*
*असाध्य ते साध्य करितां सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।।३।।*

सार्थ तुकाराम गाथा अभंग क्र. १५९

## अंधश्रद्धा निर्मूलन

श्री समर्थ रामदासस्वामी व जगद्‌गुरू श्री तुकाराममहाराज या दोन संतांची विशेषता कोणती? या दोन्ही संतांनी समाजात भगवद्‌भक्ती निर्माण करीत असताना समाजातील दोषांवर, अपप्रवृत्तींवर, अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केले. समाजातील अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य या संतांनी केले. त्यांनी समाजातील दोष आईच्या ममतेने दूर करण्याचा प्रयत्न केला. समाजरूपी मळ्यातील अंधश्रद्धारूपी तण त्यांनी काढले; पण समाजातील श्रद्धा त्यांनी उद्‌ध्वस्त केली नाही.



**श्री समर्थ रामदास**

*ब्रह्मा लिहितो कपाळीं । आणी वाचून जाते सटी ।*
*ऐशा प्रकारीच्या गोष्टीं । या नांव भ्रम ।।१०।६।३४*

*मेले मनुष्य स्वप्ना आलें । तेणें कांहीं मागितले ।*
*मनी अखंड बैसले । या नांव भ्रम ।।१०।६।२६*

*दुश्चिन्हे अथवा अपशकुन । मिथ्या वार्तेने भंगें मन ।*
*वचके पदार्थ देखोन । या नांव भ्रम ।।१०।६।२०*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*वैद्य वाचविती जीवां । तरीं कोण ध्यातें देवा ।।१।।*
*काय जाणों कैसी परी । प्रारब्ध ते ठेवी उरी ।।२।।*
*अंगी दैवत संचरे । मग तेथे काय उरें ।।३।।*
*नवसें कन्या पुत्र होती । तरी कां करणे लागे पती ।।४।।*
*जाणे हा विचार । स्वामी तुकयाचा दातार ।।५।।* सा. तु. गा. १८७

## करणी व कथनीतील एकवाक्यता

संत आणि पंत (सामान्य माणूस) यांच्यात मुख्य फरक कोणता? सामान्य माणूस जसे बोलतो, तसे वागत नाही. त्यामुळे त्याच्यावर आपण विश्वास ठेवत नाही. संतांचा उपदेश आपल्याला पटतो व त्याचे आपण अनुकरण करतो. कारण त्यांच्या करणी व कथनीत एकवाक्यता असते. संतांचे बोलणे व वागणे यांत फरक नसतो. संत एकनाथ अगोदर गोडाचा त्याग करतात आणि मगच मुलास सांगतात, 'गोड खाऊ नकोस.'

**श्री समर्थ रामदास**

*बोलण्यासारिखे चालणें । स्वयें करून बोलणे ।*
*तयांची वचनें प्रमाणें । मानिती जनीं ।।१२।१०।३९*

*सदा बोलण्यासारिखे चालताहे ।*
*अनेकी सदा येक देवांसि पाहे ।।*
*सगुणीं भजे लेश नाही भ्रमाचा ।*
*जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।* मनाचे श्लोक ४९

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*सारावीं लिंगाडे धरावा सुपंथ । जावे उसंतीत हळूहळू ॥१॥*
*पुढे जातियाचे उमटले माग । भांबावलें जग आडरानें ॥२॥*
*वेचल्याचा पाहें वरावरी झाडा । बळाचा निधडा पुढलियां ॥३॥*
*तुका म्हणे जैसी दाखवावी वाणी । ते द्यावी भरोनि शेवट तो ॥४॥*

सा. तु. गा. अ. १३९९

## अपकीर्ती

सज्जन माणसास एकवेळ राहायला चांगले घर नसले तरी चालेल. खाण्यास मिष्टान्न मिळाले नाही तरी चालेल. नेसण्यास चांगले कपडे मिळाले नाही तरी त्याचे वृत्तीत फरक पडणार नाही, पण त्याची अपकीर्ती झालेली तो कदापिही सहन करणार नाही. आपण कीर्तिवंत झालो नाही तरी चालेल, पण समाजात आपली अपकीर्ती होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

**श्री समर्थ रामदास**

*अपकीर्ती ते सांडावी । सद्कीर्ती ते वाढवावी ।*
*विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥२।२।४१*

*देहेत्यागिता कीर्ती मागे उरावी*
*मना सज्जना हेचि क्रिया धरावी ॥ मनाचे श्लोक ८*

*मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।*
*तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावे ॥*
*जनीं निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।*
*जनीं वंद्य ते सर्वभावे करावे ॥ मनाचे श्लोक २*

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*जेणे वाढे अपकीर्ती । सर्वार्थी तें त्यजावें ॥१॥*
*सत्य रुचे भलेपण । वचन ते जगासी ॥२॥*
*होईजें तें शूरत्यागें । वाऊगें तें सारावें ॥३॥*
*तुका म्हणे खोटे वर्म । निंद्य कर्म ते काळिमा ॥४॥*

सा. तु. गा. अ. १७९०

## वादविवाद

काही लोकांना वाद घालण्याची हौस असते. त्यांना असे वाटते की, वाद केल्यानेच आपले मत दुसऱ्याला पटेल. ही मंडळी काहीवेळा वादात विजयी होतात. त्यावेळी



मीच जिंकलो असा भाव त्यांचे चेहऱ्यावर तरळतो. त्यामुळे कदाचित खोटे समाधान लाभत असेलही, पण समोरच्याचे मतपरिवर्तन होत नाही. किंबहुना दुसरा माणूस दुखावलेला असतो. यापेक्षा त्याच्याशी प्रेमाने बोलून व प्रेमाने वागूनच त्याचे मतपरिवर्तन होते. म्हणून हे दोन्ही संत वादविवाद टाळावा असे सांगतात.

**श्री समर्थ रामदास**

*जनीं वादविवाद सोडून द्यावा ।*
*जनीं सूखसंवाद सूखें करावा ॥*
*जगीं तोचि तो शोक संताप हारी ।*
*तुटे वाद संवाद तो हितकारी ॥* मनाचे श्लोक १०९

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*हेचि वादकाची कळा । नाहीं येऊ देत बळां ॥१॥*
*धीर करावा । तरी तो आहे आम्हां देवां ॥२॥*
*रिघावे पोटात । पाया पडोनि घ्यावा अंत ॥३॥*
*तुका म्हणे वरी । गोडा आणावा उत्तरीं ॥४॥* सा. तु. गा. २८०८

## सामाजिक समरसता

संतांनी समाजात भगवद्भक्ती रुजविली, पण त्याचबरोबर समाजातील भेदभाव नष्ट करून समाज एकरस, एकसंध करण्याचा प्रयत्न केला. संतांना जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी दडलेल्या परमात्म्याचे दर्शन झाल्याने. जो जो कोणी भेटला तेथे त्यांना भगवंताचेच दर्शन घडले **'जे जें भेटिजे भूत तें ते मानिजे भगवंत ।।'** हाच त्यांच्या मनात भाव असल्याने, त्यांच्या मनात भूतमात्रांबद्दल करुणाच वसत होती. त्यामुळे त्यांच्या वागण्यात सहजता होती. कोठेही नाटकीपणा नव्हता. म्हणूनच अपार करुणामय अंत:करणाच्या नाथ महाराजांनी भर दुपारी बारा वाजताच्या उन्हात वाळवंटात रडणाऱ्या अंत्यजाच्या मुलास कडेवर घेतले. तर १६७४ साली रामनवमी उत्सवात समर्थांनी चाफळला. १,००० अस्पृश्य दांपत्यांना भोजन देऊन पुरुषांना धोतर व स्त्रियांना साडी-चोळी देऊन सत्कार केला व त्यांना साष्टांग दंडवत घातला. संतांची ही करुणामय वृत्ती. आपल्या मनात रुजली, तरच सामाजिक समरसता निर्माण होईल.

**श्री समर्थ रामदास**

*भेटो कोणी एक नर । धेड महार चांभार ।*
*त्याचे राखावे अंतर । या नांव भजन ॥*

*रामीं रंगले ते मन । असो नीच याति ।*
*तयाच्या चरणाची । वंदीन मी माती ॥*

*ब्राह्मणाचे ब्रह्म ते सोवळे । शूद्राचे ब्रह्म ते ओवळे ।*
*ऐसे वेगळे आगळे । तेथे असेचिना ॥७।२।२५*

**श्री जगद्गुरू तुकाराम**

*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥१॥*
*आईकाजी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हीत सत्य करा ॥२॥*
*कोणाही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ॥३॥*
*तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुखदुःख जीव भोग पावे ॥॥४॥*

सा. तु. गा. २१

## कवित्व कसे नसावे

जुन्या पिढीतील प्रख्यात साहित्यिक व समीक्षक प्रा. श्री. म. माटे. प्राचीन मराठी काव्याचे तीन भाग करतात. संतकाव्य, पंतकाव्य व तंतकाव्य. संतांनी रचलेले अभंग, श्लोक, ओवी म्हणजे संतकाव्य. मोरोपंत, वामन पंडीत यांचे काव्य म्हणजे पंतकाव्य. पोवाडा, लावणी, जात्यावरील ओव्या हे तंतकाव्य. पंत व तंत काव्यावर संत वाङ्मयाचा प्रभाव जाणवतो. संतांच्या काव्यात 'प्रासाद आणि ओज' हे गुण आढळतात. संतसाहित्यात शांतरसचा परिपोष आहे. परमेश्वराबद्दलचे उत्कटभाव, त्यांना आलेली अनुभूती व्यक्त करण्यासाठी त्यांनी काव्य हेच प्रभावी साधन वापरले आहे. त्यामुळे संतांचे दृष्टिकोनातून ज्या काव्यांतून भगवंताचे वर्णन केले आहे. ते चांगले काव्य अशीच त्यांची धारणा आहे. समर्थ रामदास व संत तुकाराम यांनी कवित्वाचा याच दृष्टिकोनातून विचार केला आहे.

**श्री समर्थ रामदास**

*क्रियेवीण शब्द ज्ञान । तया न मानिती सज्जन ।*
*म्हणौनि देव प्रसन्न । अनुतापें करावा ॥१४।३।५*
*कामिक, रसिक, शृंगारिक । वीर हास्य प्रस्ताविक ।*
*कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥१४।३।११*
*मन जाले कामाकार । तैसेचि निघती उद्गार ।*
*धीटपाठें परपार । पाविजेत नाही ॥१४।३।१२*

*व्हावया उदरशांती । करणे लागे नरस्तुती ।*
*तेथें केली जे वेत्पत्ती । त्यां नाव धीटपाठ ॥१४।३।१३*



**जगद्गुरू श्री तुकाराम**

*कलियुगीं कवित्व करिती पाखांड । कुशल हे भांड बहु झाले ॥१॥*
*द्रव्य दारा चित्तीं प्रजांची आवडी । मुखे बडबडी कोरडेचि ॥२॥*
*दंभ करी सोंग मानावया जग । मुखें बोले त्याग मनीं नाही ॥३॥*
*वेदाज्ञे करोनि न करिती स्वहित । नव्हती अलिप्त देहाहुनि ॥४॥*
*तुका म्हणे दंड साहील यमाचे । न करी जो वाचे बोले तैसे ॥५॥*

सा. तु. गा. ४०५

## कवित्व कसे असावे

*जयां अंतरी भगवंत । अचल राहिला निवांत ।*
*तो स्वभावे जे बोलत । ते ब्रह्म निरुपण ॥१४।३।२५*

*ऐसा भगवंती रंगला । आणिक कांही नलगे त्याला ।*
*स्वइच्छा वर्णू लागला । ध्यान कीर्ती प्रताप ॥१४।३।३१*

*देहे तंव पाचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथीचा ।*
*आणी कवित्व प्रकार मानुशाचा । काशावरूनी ॥२०।१०।३४*

*सकळ करणें जगदीशांचे । आणि कवित्वाचि काय मानुशाचे ।*
*ऐशा अप्रमाण बोलण्याचे । काय घ्यावें ॥२०।१०।३५*

**जगद्गुरू श्री तुकाराम**

*करितो कवित्व म्हणाल हे कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ॥१॥*
*माझीये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ॥२॥*
*काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तेचि वदे ॥३॥*
*निमित्त मापासी बैसविलो आहे । मी तों काही नव्हें स्वामिसत्ता ॥४॥*
*तुका म्हणे आहे पाईकचि खरा । वागविता मुद्रा नामाची हें ॥५॥*

सा. तु. गा. अ. ६०५

## ब्राह्मण कोणास म्हणावे?

ब्राह्मण कुणाला म्हणायचे? जो ब्राह्मणकुळात जन्माला आला तो ब्राह्मण? की सत्यनारायणाची पूजा किंवा त्यासारखे धार्मिक कर्म करणारा ब्राह्मण? मला वाटते या विषयावर चर्चा करण्यापेक्षा हे संतद्वय काय निर्णय देतात तेच पाहूया.

**श्री समर्थ रामदास**

*करिती ब्रह्म निरुपण । जाणती ब्रह्म संपूर्ण ।*
*तेचि जाणावे ब्राह्मण । तत्वविद ॥६।५।२४*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*ब्राह्मण तो याती अंत्यज असतां । मानावा तत्वतां निश्चयेसी ॥१॥*
*रामकृष्ण नाम उच्चारी सरळ । आठवीं सावळें रूप मनीं ॥२॥*
*शांति क्षमा दया अलंकार अंगी । अभंग प्रसंगीं धैर्यवंत ॥३॥*
*तुका म्हणे गेल्या षडउर्मी अंग । सांडुनियां मग ब्राह्मण तो ॥४॥*

सा. तु. गा. ७०७

## संसाराचे नश्वरत्व

आपण सर्वजण अतिशय मनापासून संसार करतो. किंबहुना भ्रमरासारखे आम्ही प्रपंचात अडकलेलो असतो. तो भुंगा फुलातील मध सेवन करण्यासाठी कमळाच्या फुलात शिरतो व तो भान हरपतो. रात्र होते व कमळाच्या पाकळ्या मिटतात व बिचारा भुंगा त्यातच अडकतो. अगदी असेच आपले झाले आहे. या संसारातून सुखरूपी मध मिळेल. म्हणून आपण संसारूपी फुलात अडकलो आहोत. हा संसार मोहक आहे पण नाशिवंत आहे. **'दिसे भासते ते सारे विश्व नाशिवंत'** मग नश्वर संसार नेटका कसा करायचा?

**श्री समर्थ रामदास**

*संसार मुळीचा नासका । विवेकें करावा नेटका ।*
*नेटका करितां फिकां । होत जातो ॥*

*परम मूर्खामाजि मूर्ख । संसारी जो मानी सुख ।*
*या संसारा ऐसे दुःख । आणीक नाही ॥*

*मी लटिका माझे बोलणे लटिकें । मी लटिका माझे चालणे लटिके ।*
*मी माझे अवघेचि लटिके । काल्पनिक ॥९।३।३७*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*लटिका तो प्रपंच एक हरिनाम साच ।*
*हरिविण आहांच सर्व इंद्रियें ॥१॥*
*लटिकें ते मौन भ्रमाचे स्वप्न ।*
*हरिविण ध्यान नश्वर आहे ॥२॥*



*लटकिया वित्पत्ती हरिविण करिती ।*
*हरीं नाहीं चित्ती तो शव जाणा ॥३॥*
*तुका म्हणे हरि हें धरिसी निर्धारी ।*
*तरी तू झडकरी जासी वैकुंठासी ॥४॥* संत तुकाराम गाथा १९९७

## संतमहिमा

संसाराचे नश्वरत्व लक्षात आले. प्रपंचही नीट चांगला पार पडला पाहिजे. मग त्यासाठी जे शाश्वत आहे. त्याचा शोध घेतला पाहिजे. समुद्रावरील लाटांच्या मोहात न अडकता घनगंभीर सागराचे दर्शन घेतले पाहिजे. दागिन्यातील कलाकुसरीत गुंतून न पडता ज्या सोन्यापासून हे अलंकार तयार केले. त्या सोन्याचे ज्ञान करून घेतले पाहिजे. या नश्वर संसाराचा शाश्वत आधार असे जे चैतन्य आहे त्या चैतन्याची अनुभूती घेतली पाहिजे. ही अनुभूती घ्यायची तरी कशी? अगदी साधा उपाय! ज्यांनी परमात्मतत्त्वाची अनुभूती घेतली; ज्यांना सगुण-साकार परमेश्वराचे दर्शन झाले अशा संतांच्या सहवासात राहायचे. अशा संतांचा महिमा कसा अन् किती सांगायचा.

**श्री समर्थ रामदास**

*जे त्रैलोकीं नाही दान । तें करिती संत सज्जन ।*
*तया संतांचे महिमान । काय म्हणौनि वर्णावें ॥१।५।२४*

*ऐसी संतांची महिमा । बोलिजे तितुकी उणी उपमा ।*
*जयांचेनि मुख्य परमात्मा । प्रगट होये ॥१।५।२६*

*संत आनंदाचे स्थळ । संत सुखचि केवळ ।*
*नाना संतोषाचे मूळ । ते हे संत ॥१।५।१६*
*संत विश्रांतीची विश्रांती । संत तृप्तीची निजतृप्ती ।*
*नातरी भक्तीची फलश्रुती । ते हे संत ॥१।५।१७*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*संतांचा महिमा तो बहु दुर्गम । शब्दादिकाचे काम नाही येथे ॥१॥*
*बहु दुधड जरी झाली म्हैस गाय । तरी होईल काय कामधेनू ॥२॥*
*तुका म्हणे अंगा व्हावे ते आपण । तरीच महिमान येईल कळो ॥३॥*

सा. तु. गा. ६७६

*संतांचे सुख झाले या देवा । म्हणउनि सेवा करी त्यांची ॥१॥*
*तेथे माझा काय कोण तो विचार । वर्णाविया पार महिमा त्यांचा ॥२॥*

*निर्गुण आकार झाला गुणवंत । घाली दंडवत पूजोनिया ॥३॥*
*तीर्थे त्यांची इच्छा करिती नित्यकाळ । व्हावया निर्मळ आपणांसी ॥४॥*
*अष्टमा सिद्धींचा कोण आला पाड । वागों नेदी आड कोणी तया ॥५॥*
*तुका म्हणे ते हे बळिया शिरोमणी । राहिले चरणी निकट वास ॥६॥*

सा. तु. गा. ७१४

## भोंदुगुरू किंवा असद्‌गुरू

परमार्थात प्रगती करायची असेल, तर सद्‌गुरूंची अतिशय आवश्यकता आहे. सद्‌गुरूच शिष्यातील दोष काढून त्याला ज्ञान देतात. शास्त्रात सद्‌गुरूंचे तीन गुण सांगितले आहेत. ते श्रोत्रीय, ब्रह्मनिष्ठ व दयाळू असावेत. दुर्दैवाने सध्या परमार्थाचाही बाजार झाला आहे. त्यामुळे ही लक्षणे ज्या महापुरुषांच्यात आहेत, त्यांनाच गुरू करावे. भोंदुगुरूंपासून सावध असावे. असद्‌गुरू आपले सर्वार्थाने नुकसान करतील.

**श्री समर्थ रामदास**

*जें जें मन आंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करीं ।*
*तो गुरू नव्हे भिकारी । झडे आला ॥१५।२।२०*
*शिष्यास न लाविती साधन । न करविती इंद्रिये दमन ।*
*ऐसे गुरू अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावें ॥१५।२।२१*
*जो गुरू भीडसारू । तो अद्धमाहून अद्धम थोरु ।*
*चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ॥१५।२।२५*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*एका करिती गुरू गुरू । भोवतां भारु शिष्यांचा ॥१॥*
*पूंस नाही पाय चारी । मनुष्य परी कुतरीं तीं ॥२॥*
*पर स्त्री मद्यपान । पेंडरखाण माजविले ॥३॥*
*तुका म्हणे निर्भर चित्ती । अधोगती जावयां ॥४॥* सा. तु. गा. ७०८

## संतांचे कार्य

संत कुणाला म्हणायचे? ‘करि वृत्ति जो संत तो संत जाणा ।’ असे समर्थ रामदास स्वामी महाराज सांगतात. कोणत्याही परिस्थितीत ज्यांचे मन अतिशय शांत व अविचल असते ते संत. हे संत ईश्वराचे अवतार असतात. जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते; अधर्माची वाढ होते तेव्हा संतांचे रूपात परमेश्वर अवतार घेतो. भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात, ‘यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥’ हाच विचार हे संतद्वय कसा सांगतात ते पाहा.



**श्री समर्थ रामदास**

*राघवाचा वर पावलो सत्वर ।*
*जनाचा उद्धार करावया ॥*

*धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।*
*जाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे ॥१८।६।२०*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*धर्मािचें पाळण । करणें पाषांड खंडन ॥१॥*
*हेचि आम्हा करणे काम । बीज वाढवावे नाम ॥२॥*
*तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरे ॥३॥*
*नाहीं भीड भार । तुका म्हणे साना थोर ॥४॥*

सा. तु. गा. १४४५

## कृतज्ञता

आमच्यावर पाश्चिमात्य संस्कृतीचा जबरदस्त पगडा आहे. त्यामुळे आम्ही त्यांचे अंधानुकरण करीत आहोत. आम्ही आभार मानतो, विनंती करतो, पण त्यात नाटकीपणाच जास्त असतो. आम्ही लोकांचे आभार मानतो, पण ज्या परमेश्वराने हा सुंदर देह दिला, चांगले अन्न खायला दिले. राहायला घर दिले. त्याचेविषयी मात्र आमचे मनात कृतज्ञता नसते. संत सतत परमेश्वराच्या अनुसंधानात असल्याने, त्यांचे अंत:करणात ही परमेश्वराबद्दलची कृतज्ञता सतत वास करते. म्हणूनच ते आपणास अंत:करणापासून सांगतात, ‘अरे, ज्याने तुला जन्मास घातले त्याचे स्मरण कर. कधीतरी कृतज्ञबुद्धीने त्याचेसमोर नतमस्तक हो.’

**श्री समर्थ रामदास**

*जो अन्न देतो उदरांसी । शरीर विकावे लागे त्यासी ।*
*मां जेणे घातिले जन्मासी । त्यासी कैसें विसरावे ॥*
*अहर्निश ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता ।*
*मेघ वरुषे जयाची सत्ता । सिंधू मर्यादा धरी ॥*
*जगीं पाहतां देव हा अन्नदाता ।*
*तया लागली तत्त्वता सार चिंता ॥*
*तयाचें मुखीं नाम घेता फुकाचे ।*
*मनां सांग पा रे तुझे काय वेचे ॥* म. श्लोक ९३

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*का रे नाठविसी कृपाळू देवांसि । पोशितों जगांसि एकला तो ॥१॥*
*बाळा दुधा कोणे करिते उत्पत्ती । वाढवी श्रीपती सवे दोन्ही ॥२॥*
*फुटती तरुवर उष्णकाळ मासीं । जीवन तयांसि कोण घाली ॥३॥*
*तेणे तुझी काय नाही केली चिंता । राहे त्या अनंता आठवोनि ॥४॥*
*तुका म्हणे ज्याचे नाम विश्वंभर । त्याचे निरंतर ध्यान करी ॥५॥*

सा. तु. गा. १५९३

## अहंकार

आपण समाजात निरनिराळ्या प्रकारची माणसे पाहातो. काहीजण केवळ स्वत:बद्दल, आपल्या कुटुंबाबद्दल सतत बोलत असतात. त्यांच्या वागण्यातून, बोलण्यातून अहंकार सतत जाणवत असतो. हळूहळू लोक त्यांना टाळू लागतात. हा अहंकार प्रपंचात, सामाजिक कार्यांत अतिशय वाईट. परमार्थात तो फारच वाईट असतो. ज्यांना पारमार्थिक क्षेत्रात प्रगती करायची असेल, त्यांनी अहंकाराचा त्याग केलाच पाहिजे. या अहंकाराबद्दल दोन्ही संतांचे विचार एकच आहेत. किंबहुना स्वरूपत: ते एकच असल्याने दोघांनीही माशीचा दृष्टांत देखील एकच दिला आहे.

**श्री समर्थ रामदास**

*जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची ।*
*तया भोजनाची रुची प्राप्त कैची ॥*
*अहंभाव ज्या मानसीचा विरेना ।*
*तया ज्ञान हे कल्पकाळी जिरेना ॥* मनाचे श्लोक १५९

*अहंता गुणे सर्वही दु:ख होते । मुखे बोलिलें ज्ञान ते वेर्थ जाते ।*
*सुखी राहता सर्वही सुख आहे । अहंता तुझी तूचि शोधोनि पाहे ॥*

मनाचे श्लोक १६१

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*दुधाचे घागरी मद्याचा हा बुंद ।*
*पडिलिया शुद्ध नव्हे मग ॥१॥*
*तैसे खळा मुखे न करावे श्रवण ।*
*अहंकारे मन विटाळले ॥२॥*
*काय करावी ती बत्तीस लक्षणे ।*
*नाक नाही तेणें वाया गेली ॥३॥*



*तुका म्हणे अन्न जिरो नेदी माशी ।*
*आपुलिया जैसी संसर्गें ॥४॥* सा. तु. गा. १०५६

## मनाचे चांचल्य

आपण पाणी अडवू शकतो. झाडाची वाढ रोखू शकतो. एखाद्या व्यक्तीला पकडून ठेवू शकतो. पण वाऱ्याला अडविता येईल काय? वाऱ्याला अडवणे, रोखून धरणे किंवा पकडणे अवघड त्याचप्रमाणे मनाला आवरणे अतिशय कठीण, म्हणूनच अर्जुन भगवंताला म्हणतो, ''चंचल हि मन: कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ॥'' रज व तम गुणांचे प्राबल्य असल्याने मन चंचल आहे.

**श्री समर्थ रामदास**

*अनुदिनी अनुतापे तापलो रामराया ।*
*परम दिन दयाळा नीरसी मोह माया ॥*
*अचपळ मन माझे नावरे आवरीता ।*
*तुजविण शीण होतो धाव रे धाव आंता ॥* करुणाष्टके १।१

*चपळपण मनाचे मोडिता मोडवेना ।*
*सकळ स्वजन माया तोडितां तोडवेना ॥*
*घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरीचा ।*
*म्हणवूनि करुणा हे बोलतो दीन वाचा ॥* करुणाष्टके १।५

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*मन माझे चपळ न राहे निश्चळ ।*
*घडीं एकी पळ स्थिर नाही ॥१॥*
*आतां तू उदास नव्हे नारायण ।*
*धावे मज दीना गांजियेले ॥२॥*
*धाव घाली पुढे इंद्रियाचे ओढी ।*
*केले तडातोडी चित्त माझे ॥३॥*
*तुका म्हणे माझा न चले सायास ।*
*राहिलो मी आस धरुनी तुझी ॥४॥* सा. तु. गा. ११३६

## कीर्तन

प्रपंचात गुंतलेले मन एकदम परमार्थात रंगणे अवघड आहे. जप, ध्यान, सैद्धांतिक पुस्तकांचे वाचनाने मन रमणार नाही. यासाठीच कीर्तनभक्ती सांगितली आहे. कीर्तनातील

संगीत, त्यातील कथा यांमुळे कीर्तनात माणूस रमतो. किंबहुना कीर्तन हा एकपात्री प्रयोग आहे. कीर्तन हे समाजप्रबोधनाचे मोठे साधन आहे. थोर संत व समाजसुधारक श्री गाडगेबाबा यांनी कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छता, शिक्षण यांचा संदेश जनसामान्यांना दिला. कीर्तन ही नवविधा भक्तीतील दुसरी भक्ती आहे. **'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।'**

**श्री समर्थ रामदास**

*कीर्तनें महादोष जाती । कीर्तनें होय उत्तम गती ।*
*कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थी संदेह नाही ।।४।२।२७*

*सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण ।*
*तेणे नारद तोचि नारायणे । बोलिजेत आहे ।।४।२।३०*

*म्हणौनि कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।*
*सकळ तीर्थे आणि जगदात्मा । हरि कीर्तनीं वसें ।।४।२।३१*

*बहुत करावे पाठांतर । कंठी धरावे ग्रंथांतर ।*
*भगवत् कथा निरंतर । करीत जावी ।।४।२।३*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*जळती कीर्तनें । दोष पळतील विघ्नें ।।१।।*
*हेचि बळवंत गाढें । आनंद करु दिंडी पुढें ।।२।।*
*कळि पापाची हे मूर्ति । नाम खड्ग घेऊं हातीं ।।३।।*
*तुका म्हणे जाऊं । बळें दमामें ही लावूं ।।४।।* सा. तु. गा. १६०७

*कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं असे ।।१।।*
*भक्त जाय सदा हरि कीर्ती गात । त्यासवें अनंत हिंडतसे ।।२।।*
*त्रैलोक्य भ्रमण करीत नारद । त्यांसवें गोविंद फिरतसें ।।३।।*
*नारद मंजुळे सुस्वरें गीत गाये । मार्गी चालताहे संगे हरी ।।४।।*
*तुका म्हणे त्याला गोडी कीर्तनाची । नाही आणिकांची प्रीती ऐसी ।।५।।*

सा. तु. गा. ३०२६

## कथेचे मोल

आजच्या दूरदर्शनच्या दुनियेत कीर्तन आणि कीर्तनकार दूरत्वानेच पाहावयास मिळतात. याशिवाय कीर्तनकार जे कीर्तनाचे मोल किंवा मानधन एवढे जबरदस्त घेतात की, कीर्तनाचे आयोजन करणे आयोजकांना अवघड जाते. ज्यांचा चरितार्थ



या कीर्तनावर चालतो त्यांनी अवश्य मानधन घ्यावे, पण त्यालाही काही मर्यादा हवी. कीर्तनाचा धंदा झाला असताना आनंदाची गोष्ट हीच की, वारकरी तसेच अन्य संप्रदायातील कीर्तनकार काहीही मानधन घेत नाहीत. हे निर्लोभी, निरपेक्ष कीर्तनकार या संतद्वंयांचाच वारसा पुढे चालवीत आहेत.

**श्री समर्थ रामदास**

*लग्न मुहुर्ती जाऊं नये । पोटासाठी गाऊं नये ।*
*मोले कीर्तन करूं नये । कोठेतरी ।।१४।१।५५*

*ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणा ऐसा सांची अर्थ ।*
*अर्थासाठी लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ।।२।१०।३५*

*नेणपण सोडूं नये । महंतपण सांडूं नये ।*
*द्रव्यासाठी हिंडों नये । कीर्तन करीत ।।१४।१।४५*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*कथा करुनियां मोल ज्यापें घेतीं । तेही दोघे जाती नरकामध्ये ।।१।।*
*ब्रह्म पूर्ण करा ब्रह्म पूर्ण करा । अखंड स्मरा राम राम ।।२।।*
*मधुर वाणीच्या नका पडू भरीं । जाल यमपुरी भोगावया ।।३।।*
*तुका म्हणे करी ब्रह्मांड ठेंगणे । हात पसरी जिणें धिग् त्याचे ।।४।।*

सा. तु. गा. ९२६

## आत्मपरीक्षण

मराठीत एक म्हण आहे 'दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसते, पण स्वत:च्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही.'' दुसऱ्यामधील छोटा दोषही आपणांस दिसतो पण स्वत:मधील मोठा दोषही दिसत नाही. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात यशस्वी व्हावयाचे असेल, तर आत्मपरीक्षण केले पाहिजे. स्वत:तील दोष लक्षात घेऊन ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परमार्थातही या आत्मपरीक्षणाची आत्यंतिक गरज आहे. सर्वच संतांनी आपल्यामधील दोष प्रकटरीत्या मान्य केले. स्वत:मधील दोष मान्य करताना त्यांना संकोच वाटला नाही. म्हणूनच ते दोष त्यांनी दूर केले. त्यामुळेच ते संत झाले.

**श्री समर्थ रामदास**

*सकळ अवगुणामध्ये अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।*
*मोठे पाप करंटपण । चुकेना की ।।*

*लोक नाना परीक्षा जाणती । परी अंतर परीक्षा नेणती ।*
*तेणे प्राणी करंटे होती । प्रत्यक्ष आता ।।*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनावर ।।१।।*
*आता आड उभा राहें नारायणा । दया सिंधुपणा साच करीं ।।२।।*
*वाचा वदे परी करणे कठीण । इंद्रियां आधीन झालो देवा ।।३।।*
*तुका म्हणे तुझा जैसा तैसा दास । न धरीं उदास मायबापा ।।४।।*

*सा. तु. गा. २०८२*

## नामस्मरण

आत्मपरीक्षणानंतर स्वत:मधील दोष, दुर्गुण नाहीसे करणे कर्मकठीण. हे दोष निवारण करण्यातच संपूर्ण आयुष्य संपून जायचे. यासाठी सोपा उपाय म्हणजे जो सद्‌गुणांचा साठा आहे. जो षड्‌गुणैश्वर्य संपन्न आहे. त्यांचे सतत स्मरण करणे. अतिशय आर्ततेने त्याचे नाम घेणे. त्याला हाका मारणे. त्याने एकदा आपलेसे केले की, दोष सारेच जळून जातील. हीच नवविधा भक्तीतील तिसरी भक्ती नामस्मरण. सर्वच संतांनी ज्या भक्तीचा पुरस्कार केला अशी श्रेष्ठ भक्ती. यात फक्त मनाला उलटे करून नामात नमवावे लागते.

**श्री समर्थ रामदास**

*चहूं वर्णानामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ।*
*जड मूढ पैलपार । पावती नामें ।।४।३।२४*

*हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघांतापासून सुटला ।*
*नारायेण नामें पावन जाला। अजामेळ ।।४।३।१७*

*नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।*
*माहा पापी तेचि जाले । परम पवित्र ।।४।३।१८*

*नाम स्मरे निरंतर । ते जाणावे पुण्य शरीर ।*
*महा दोषांचे गिरीवर । रामनामे नासती ।।४।३।२२*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*नाम घेता नलगें मोल । नाम मंत्र नाही खोल ।।१।।*
*दोंचि अक्षरांचे काम । उच्चारावें राम राम।।२।।*
*नाहीं वर्ण धर्मयाति । नामीं अवघीच तरती ।।३।।*
*तुका म्हणे नाम । चैतन्य हे निजधाम ।।४।।*

सा. तु. गा. १६३१



*नांम घेता वाया गेला । ऐसा कोणे आईकिला ।।१।।*
*सांगा विनवितो तुम्हांसी । संत महंत सिद्ध ऋषी ।।२।।*
*नामें तरला नाहीं कोण । ऐसा द्यावा निवडून ।।३।।*
*सलगीच्या उत्तरा । तुका म्हणे क्षमा करा ।।४।।*

सा. तु. गा. १६३२

## भगवत् दर्शनाची ओढ

नाठाळ मन नामात रंगले की प्रपंचाची ओढ कमी होऊ लागते व परमार्थाची गोडी वाढते. परमेश्वराच्या प्राप्तीशिवाय अन्य विषय तुच्छ वाटू लागतात. असा माणूस शरीराने प्रपंचात असतो, पण मन भगवंतांचे ठिकाणी रमलेले असते. पुढे पुढे तर अशी अवस्था होते की, तो आर्ततेने परमेश्वराला विनवणी करतो 'देवा, मला का बरे दर्शन देत नाहीस?' हीच अवस्था कृष्णविरहिणी गोपींची झाली होती. सर्व संतांची पण हीच स्थिती झाली होती. या विरहातून माउलीचे उत्कट भाव प्रकट झाले विराण्यांतून. समर्थांची कारुण्यरूप करुणाष्टके याच भावनेतून झाली. जगद्‌गुरू तुकाराम महाराजांची भावव्याकुळता अनेक अभंगांतून व्यक्त झाली आहे.

**श्री समर्थ रामदास**

*घरे सुंदरे सौख्य नाना परीचे । परी कोण जाणेल ते अंतरीचे ।*
*मनी आठविताची तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।*

*तुझिया वियोगे जीवित्व आले । शरीरपांगे बहु दु:ख झाले ।*
*अज्ञान दारिद्र्य माझे स्मरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ।।*

*कृपाळुपणे भेट रे रामराया । वियोगे तुझ्या सर्व व्याकूळ काया ।*
*जनामाजि लौकिक हाही न सूटे । उदासीन हा काळ कोठे न कंठे*

*म्हणे दास मी वास पाहें दयाळा । रघूनायका भक्तपाळा भुपाळा ।*
*पहावे तुला हे जिवी आर्त मोठे । उदासीन हा काळ कोठे न कंठे ।।*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*आळवितां कंठ शोषला भीतर । आयुष्य वेचें धीर नाहीं मना ।।१।।*
*अझून कां नये तुझ्या अंतरा । दीनांच्या माहेरा पांडुरंगा ।।२।।*
*धन दिसे डोळां दगडाचे परी । भोग ते शरीरी वीष झाले ।।३।।*
*चुकलों काय ते मज क्षमा करी । आलिंगूनि हरी प्रेम द्यावे ।।४।।*
*अवस्था राहिली रुपाची अंतरी । बाहेर भीतरी सर्व काळ ।।५।।*
*तुका म्हणे माझे सकळ उपाय । पांडुरंगा पाय तुझे आता ।।६।।* सा.तु.गा.१२८१

## सख्यभक्ती

नवविधा भक्तीने भक्ताचा क्रमश: विकास होत जातो. नवविधाभक्ती म्हणजे नऊ पायऱ्या आहेत. श्रवणापासून टप्प्याटप्प्याने आत्मनिवेदनापर्यंत पोहोचायचे. शेवटी भगवत् दर्शनाचा आनंद उपभोगायचा. जसे नवविधाभक्ती हा क्रमविकास आहे. तसेच आपल्याकडे असे महापुरुष होऊन गेले की, ज्यांनी एका भक्तीच्या आत्यंतिक साधनेतून मोक्ष प्राप्त केला. राजा परीक्षित श्रवणाच्या आधारे मुक्त झाला. कीर्तनभक्तीमध्ये श्रेष्ठ नारद आणि भगवंताशी सख्य साधून मुक्ती मिळवली ती अर्जुनाने.

**श्री समर्थ रामदास**

*देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांशी तुटी ।*
*सर्व अर्पावे शेवटी । प्राण तोही वेचावा ॥४।८।८*

*देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणास न करावे निर्वाण ।*
*परम प्रीतिचे लक्षण । ते हे ऐसे असे ॥४।८।१०*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*ऐसा कोणी नाही हे जया नावडे । कन्या पुत्र घोडे दारा धन ॥१॥*
*निंब घेतां रोगी कवणि या सुखे । हरावया दु:खे व्याधिपीडा ॥२॥*
*काय पळें सुखें चोर लागे पाठी । न घालावी काठी आड तया ॥३॥*
*जयाचे कारण तोचि जाणे करू । नये कोणां वारु आणिकासी ॥४॥*
*तुका म्हणे तरी सापडे निधान । द्यावा ओवाळून जीव बळी ॥५॥* सा.तु.गा.१९११

## भगवत् प्राप्तीचा उपाय

देव आम्हांला भेटत का नाही? कारण आर्ततेने, जिवाच्या आकांताने आम्ही त्याला कधी हाकच मारीत नाही. आमच्यात शबरीची निष्ठा नसते. आमच्या हाकेत द्रौपदीची आर्तता नसते. 'लोग कहते है भगवान आते नहीं । द्रौपदी की तरह हम बुलाते नहीं ।' संतांचा तो दास झाला. नाथांच्या घरी श्रीखंड्या बनून पाणी भरले. जनाबाईचे दळण दळले. छोट्या नामदेवाचे हातून जेवण घेतले. आम्हांलाही भगवंत भेटेल फक्त संतांची आर्तता आमच्या नामात यायला हवी. संतांचे चरणी आम्ही नतमस्तक झाले पाहिजे. नामस्मरणाने आपले चित्त शुद्ध झाले पाहिजे.

**श्री समर्थ रामदास**

*कंप रोमांच स्फुराणे । प्रेमाश्रु सहित गाणे ।*
*देव द्वारी लोटांगणे । नमस्कार घालावे ॥४।२।१३*



*भगवंत भावाच भुकेला । भावार्थ देखोनि भुलला ।*
*संकटी पावे भाविकाला । रक्षितसे ॥३।१०।१०*

*नमस्कारे लीनता घडे । नमस्कारे विकल्प मोडे ।*
*नमस्कारे सौख्य घडे । नाना सत्पात्रासी ॥४।६।१४*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*भावें गावें गीत । शुद्ध करुनियां चित्त ॥१॥*
*तुज व्हावा आहे देव । तरि सुलभ हा उपाव ॥२॥*
*आणिकांचे कानी । गुण दोष मना नाणी ॥३॥*
*मस्तक ठेंगणा । करी संतांच्या चरणा ॥४॥*
*वेची ते वचन । जेणे राहे समाधान ॥५॥*
*तुका म्हणे फार । थोडा तरी उपकार ॥६॥* सा. तु. गा. १६७९

## भगवंताचे व्यापकत्व

भगवंताचे दर्शन झाले की त्याचे व्यापकत्वही जाणवू लागते. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी आणि सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी त्याच चैतन्याचे दर्शन घडते आणि मग तसाच व्यवहार होऊ लागतो. कोरडी भाकरी घेऊन पळणाऱ्या कुत्र्याच्या मागे नामदेवराय पळतात अन् म्हणतात 'अरे, कोरडी भाकरी खाऊ नकोस हे तूप घे' याच भावनेतून नाथमहाराज बारा वाजताच्या उन्हात वाळवंटात रडत उभ्या असलेल्या अंत्यजाच्या मुलास कडेवर घेतात. तर रामनवमीच्या पारण्याचे वेळी समर्थांनी १००८ हरिजन कुटुंबांना जेवण दिले, योग्य तो मानसन्मान केला व 'हे भूलोकीचे देव आहेत असे म्हणून साष्टांग नमस्कार घातला.' या संतांचे हे वर्तन भगवंताचे व्यापकत्व लक्षात आल्यानेच घडले.

**श्री समर्थ रामदास**

*मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे त कष्टी होसी ।*
*राम कर्ता म्हणता पावसी । येश कीर्ती प्रताप ॥*

*वसे हृदयी देव तो जाण ऐसा ।*
*नभाचे परी व्यापकु जाण तैसा ॥*
*सदा संचला येत ना जात काही ।*
*तयावीण कोठे रिता ठाव नाही । म. श्लोक १९५*

*नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।*
*या कारणे तोषवावी । कोणीतरी काया ॥*

*देह पुरांमधे ईश । म्हणौनि तया नाव पुरुष ।*
*जगामधें जगदीश । तैसा वोळखावा ॥११।९।१२*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*चाले हे शरीर कोणाचियें सत्ते । कोण बोलवितें हरीविण ॥१॥*
*देखवी ऐकवी एक नारायण । तयांचे भजन चुकों नको॥२॥*
*मानसाची देव चालवी अहंता । मीच एक कर्ता म्हणों नये ॥३॥*
*वृक्षाचेंही पान हालें ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठे ॥४॥*
*तुका म्हणे विठो भरला सबाह्य । उणें काय आहे चराचरी ॥५॥* सा.तु.गा. ३०३८

*देवाच्या संबंधे विश्वचि सोयरें । सूत्र ओढे दोरें एकाएक ॥१॥*
*आहांच ते नव्हे विटाया सारिखें । जीव जीवनीं देखे सामावले ॥२॥*
*आणिकांचे सुख दुःख उमटे अंतरी । एथील इतरीं तेणें न्याये ॥३॥*
*तुका म्हणे ठसावले शुद्ध जाति । शोभाचि पुढती विशेषता ॥४॥*सा.तु.गा. ४२६

## भवभय

एकदा या चराचर विश्वात दडलेल्या परमेश्वराचे दर्शन झाले की संसाराचे भय नाहीसे होते. मन निर्भय होते आणि सहजपणे उद्‌गार बाहेर पडतात 'आम्ही काय कुणाचे खातो । तो राम आम्हांला देतो ।' भीती केव्हा वाटते? ज्यावेळी दुसरे कोणी तरी आहे असा विचार मनात आला की भीती वाटते. 'द्वैतात् वै भयम् ।' असे शास्त्रवचन आहे. अद्वैत स्थिती प्राप्त झाली, की भय कसे उरेल? सारे भय साऱ्या चिंता संपून जातात. उरतो तो केवळ आनंद.

**श्री समर्थ रामदास**

*भवाच्या भये काय भीतोस लंडी ।*
*धरी रे मना धीर धाकासि सांडी ॥*
*रघुनायका सारिखा स्वामि शिरी ।*
*नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥* म. श्लोक २७

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*सत्य आठवितां देव । जातो भेव पळोनि ॥१॥*
*नलगें काहीं करणे चिंता । धरी सत्ता सर्व तो ॥२॥*
*भावे भाव राहीं पायीं । देव तई सन्निध ॥३॥*
*तुका म्हणे कृष्ण नामें । शीतळे प्रेम सर्वांसी ॥४॥* सा. तु. गा. २७६७



## भगवंताशी नाते

शाळेतील मुले आपले शिक्षक सांगतात त्याप्रमाणे वागतात. नवविवाहिता आपल्या पतीला आवडेल असेच वर्तन करते. या दोघांच्या मनात एकच भाव असतो. शिक्षकाने किंवा पतीने आपणास आपले म्हणावे. तसेच जर परमेश्वराने आपणास आपले म्हणावे असे वाटत असेल, तर त्यासाठी आपण प्रयत्नशील असले पाहिजे. त्यासाठी कसा आचार असला पाहिजे.

*सदा देव काजि झिजे देह ज्याचा ।*
*सदा रामनामें वदे नित्य वाचा ॥*
*स्वधर्मेचि चाले सदा उत्तमाचा ।*
*जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥* म. श्लोक ४८

*शुद्ध बीजा पोटी । फळें रसाळ गोमटी ॥१॥*
*मुखीं अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ॥२॥*
*सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ॥३॥*
*तुका म्हणे जाती । ताप दर्शने विश्रांती ॥४॥* सा. तु. गा. ३७

## तितिक्षा

श्री ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताईनी ताटीच्या अभंगात म्हटले आहे, ''विश्व रागे झाले वन्ही । संते सुखे व्हावे पाणी ॥'' ज्याला समाजात काही चांगले गुण निर्माण करावयाचे असतील, त्यांना समाजाकडून अवहेलना, अपमान सहन करावा लागतो. माउलींच्या इतका अपमान कोणालाच सहन करावा लागला नसेल. तुकाराम महाराजांना सुरुवातीला रामेश्वरभट्टांनी खूप त्रास दिला. नंतर शास्त्रीबुवा त्यांचे निस्सीम भक्त झाले ही गोष्ट निराळी. अनेक समाजसुधारकांनाही समाजाने त्रास दिला. या सर्वांनी हा त्रास सहन केला. किंबहुना समाजावर त्यांनी आईप्रमाणे प्रेम केले. यातूनच त्यांचे संतत्व सिद्ध होते. जे समाजाचे आघात शांतपणे सोसतात. त्यांनाच संत म्हणतात.

**श्री समर्थ रामदास**

*अपमानिता सिणों नये । निखंदिता कष्टो नये ।*
*धिःकारिता झुरो नये । काहीं केल्या ॥१४।१।१४*

*नसे गर्व अंगी सदा वीतरागी ।*
*क्षमाशांति भोगी दया दक्ष योगी ॥*

*नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।*
*इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥* म. श्लोक १३४

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*हिरा ठेवितां ऐरणी । वांचे मारितां जो घणीं ॥१॥*
*तोचि मोल पावे खरा । करणीचा होय चुरा ॥२॥*
*मोहरी तोचि अंगे । सूत न जळे ज्याच्या संगे ॥३॥*
*तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात ॥४॥* सा. तु. गा. २५

## मरण

जिथे प्रारंभ आहे तिथे अंत आहे. निर्मितीबरोबर नाश हा अटळ आहे. निर्माण केलेले काचेचे भांडे कधी ना कधी फुटणार हे स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे जन्माला आलेल्या जीवाला मृत्यूला सामोरे जावे लागतेच. पण आपले वर्तन असे असते की, जणू काही आपण अमरच आहोत. याच भावनेतून आम्ही तीस-चाळीस वर्षांचे नियोजन करतो. एखाद्या आप्ताचा किंवा आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या व्यक्तीचा मृत्यू अचानक होतो आणि अचानक आपल्याला मृत्यूचे स्मरण होते. हे केवळ स्मशान वैराग्य असते. स्मशानातून बाहेर पडल्याबरोबर आम्ही आमच्याच मस्तीत जगू लागतो. संत मात्र सांगत असतात ''बाबांनो, मरण केव्हाही येईल, त्यामुळे वेळ वाया न घालवता सतत परमेश्वराचे स्मरण करा''हाच विचार दोघेही संत आपल्याला समजावून सांगत आहेत. या ठिकाणी जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराजांनी हिंदी भाषेतून आपले विचार किती प्रभावीपणे मांडले आहेत. दोघांची भाषा भिन्न आहे, पण भाव मात्र एकच आहे.

**श्री समर्थ रामदास**

*मरें एक त्याचा दुजा शोक वाहे ।*
*अकस्मात तो ही पुढे जात आहे ॥*
*पुरेना जनीं लोभ रे क्षोभ त्यातें ।*
*म्हणौनि जनीं मागुता जन्म घेते ॥*

*मरणाचे स्मरण असावे । हरिभक्तीस सादर व्हावे ।*
*मरोनि कीर्तीस उरवावे । येणे प्रकारें ॥१२।१०।१३*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम महाराज**

*काहे रोवे आगले मरना । गव्हार तू भला अपना ॥१॥*
*केते मालूम नहीं पडें । नन्हे बडे गये सो ॥२॥*



*बाप भाई लेखा नहीं । पाछे तू ही चलनार ॥३॥*
*काले बाल सोपत भये । खबर पकरो तुका कहे ॥४॥* सा.तु.गा. ३४७७

काय योगायोग आहे, पाहा! अगदी न ठरवता आज गुरुपौर्णिमेच्या पावन दिवशी लेखनाची सांगता होत आहे. मन भावविभोर झाले आहे. या दोन्ही संतांनी माझी पात्रता नसताना माझेकडून लिहून घेतले. दोन्ही संतांचे ४००व्या जयंती वर्षात ही पुस्तिका लेखनाचा एकच उद्देश आहे. संतांचे अभिन्नत्व समाजाच्या समोर आणावे. खरे पाहता संत कोणत्या समाजाचे, जातीचे, धर्माचे नसतात. ते साऱ्या विश्वाचे असतात. आम्हीच कूपमंडूकवृत्तीचे लोक या संतांना संप्रदायाच्या, जातीच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न करतो. आम्ही सूर्याचे प्रतिमेला छोट्या भांड्यात साठविण्याचा प्रयत्न करतो. अवखळ वाऱ्याला एका खोलीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न करतो. मला असे वाटते की, संप्रदायाच्या पलीकडे जाऊन या दोघांच्याही अद्वैत तत्त्वज्ञानाचे, त्यांच्या निस्सीम उपासनेचे दर्शन घेऊन आपण पुनीत व्हावे यातच आपले कल्याण आहे. या दोन्ही संतांचा काळ, कार्यक्षेत्र एकच असल्याने, दोघांची गाठभेट निश्चित झाली असणार. त्यामुळे दोघांनी परस्परांची स्तुती करून ही ऐक्यता दृढ केली आहे.

**श्री समर्थ रामदास**

*धन्य तुका वाणी धन्य तुझी वाणी । ऐकतां उन्मनी दीप लागें ॥१॥*
*धन्य निस्पृहता एकविध निष्ठा । श्रुती भाव स्पष्ट दाखविती ॥२॥*
*संतोषले चित्त होतांचि दर्शन । कळो आली खूण अवताराची ॥३॥*
*घातलासे धडा नामाचा पै गाढा । प्रेमें केला वेडा पांडुरंग ॥४॥*
*नवविधा भक्ती रुढविलीं जगीं । तारु कलियुगीं दास म्हणे ॥५॥*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*राया छत्रपती ऐकावे वचन । रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥१॥*
*रामदास स्वामी सोयरा सज्जन । यांसी तू नमन अर्पी बापां ॥२॥*
*मारुती अवतार स्वामी प्रगटला । उपदेश केला तुजलागी ॥३॥*
*धरूं नको आस आमुची भूपाळा । रामदासीं डोळा लावा वेगीं ॥८॥*
*तुका म्हणे राया मुला असो कल्याण । सद्‌गुरू शरण असे बापां ॥१५॥*

समर्थांनी ओवी, अभंग, भुजंगप्रयात, शिखरिणी अशा अनेक वृत्तात काव्य केले तर तुकोबारायांचे अभंगच प्रसिद्ध आहेत. म्हणूनच एक कवी म्हणतो, ''अभंग वाणी प्रसिद्ध तुकयाची.'' पण तुकाराममहाराजांनी अन्य काव्य प्रकार

हाताळलेले आहेत. त्यांनी सुद्धा ओवी, श्लोक लिहिलेले आहेत.

**श्री समर्थ रामदास**

*श्रुती न्याय मीमांसके तर्कशास्त्रें । स्मृती, वेद वेदान्त वाक्ये विचित्रें ।।*
*स्वयें शेष मौनावला स्थीर पाहे । मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।।* (म. श्लोक १५८)

**जगदगुरू श्री तुकाराम**

*भव भजना व्यापका लोक तिन्ही । तुज वर्णिता शीणला शेष फणी ।।*
*असो जीवभावें तुझ्या सर्व पायीं । दुजे मागणे आणिक व्यर्थ काई ।।*

सा. तु. गा. ४/३३५०

* शेषाचा दिलेला दृष्टान्त दोघांचेही विचारातील ऐक्य आपणास दर्शवतो.

सारी धडपड सारा अट्टहास ज्ञान प्राप्तीसाठी. एकदा या चराचरातील परमेश्वराचे किंवा आत्मतत्वाचे दर्शन झाले की उरतो तो केवळ आनंद. या अनुपम स्थितीचे वर्णन तरी कसे करणार? ही दिव्यत्वाची अनुभूती शब्दबद्ध तरी कशी करणार? खरं म्हणजे या अवस्थेशी शब्दाशिवायच संवाद साधायचा. संतांनी केवळ आपल्यावर कृपा करावी या हेतूनेच ही त्यांची अनुभूती शब्दबद्ध केली.

**श्री समर्थ रामदास**

*कळे आकळे रूप ते ज्ञान होता । तेथे आटली सर्व साक्षी अवस्था ।।*
*मना उन्मनी शब्दकुंठीत राहे । तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहे ।।*

**जगद्‌गुरू श्री तुकाराम**

*अणुरेणु या थोकडा । तुका आकाशा एवढा ।।१।।*
*गिळुनि सांडिले कलिवर । भवभ्रमाचा आकार ।।२।।*
*सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।।३।।*
*तुका म्हणे आतां । उरलो उपकारा पुरता ।।४।।* सा. तु. गा. ३३४०

*बळबुद्धी वेचूनिया शक्ती । उदक चालवावे युक्ती ।।१।।*
*नाही चळण तया अंगी । धांवे लवणामागे वेगी ।।२।।*
*पाटमोट कळा । भरित परवाला सागळा ।।३।।*
*बीजा ज्यासी द्यावे । तुका म्हणे तैसे व्हावे ।।४।।* ***तुकाराम- तुकारामगाथा***

*नदीचे उदक वाहत गेले । तो ते निरर्थक चालले ।।*
*जरी बांधोनी काढिले । नाना तीरी कालवे ।।*
*उदक निगेने वर्तविले । नाना जिनसी पीक काढिले ।।*
*पुढे उदकचि जाहले । पीक सुवर्ण ।।* ***समर्थ रामदास - सप्तसमासी***